# Washim District Police

**Nature of Work** :- **Solving Sensational Crimes**

**Police Station** :- **Washim Rural**

**Date of Good Work done** :- **09/05/2022**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन वाशीम ग्रामीण हद्दीतील ग्राम केकतउमरा येथील हत्येचा पोलिसांनी केला 24 तासांचे आत उलगडा, बापाची हत्या करणाऱ्या आरोपी मुलास केले जेरबंद.

# मुलगाच ठरला बापाचा वैरी

## पूजारी हत्या प्रकरण : मारेकरी मुलाला अटक, ग्रामीण पोलीसांची कारवाई

**पब्लिक पोस्ट प्रतिनिधी**



**वाशिम** : वाशिम तालुक्यातील केकतऊमरा येथे दि. ६ मे ते ७ मे रोजीचे रात्री दरम्यान वाशिम ते केकतउमरा रोडवरील तामसाळा शेतशिवारातील दुर्गामाता संस्थान , मंदिरामध्ये पुजारी मारोती भिकाजी पुंड , वय ५२ वर्ष , रा . केकतऊमरा हे नेहमी प्रमाणे मंदिरात झोपले असता रात्री दरम्यान कोणीतरी अज्ञात व्यक्तीने मंदिरात प्रवेश करून पुजारी मारोती पुंड यांचे पाठीमागुन डोक्यावर मारून जिवाने ठार मारले . अशा फिर्यादी मयताची पत्नी नामे पुंजाबाई मारोती पुंड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन वाशिम ग्रामीण येथे अपराध नं . १ ९ ४ / २२ कलम ३०२ भादंवि गुन्हा नोंद करण्यात आला . . गंभीर स्वरूपाच्या गुन्हा घडल्याने जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिह , वाशिम यांनी तात्काळ सहायक पोलीस अधीक्षक तथा ठाणेदार महक स्वामी ( भा.पो.से. ) , उपविभागीय पोलीस अधिकारी सुनिल पुजारी , पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा सोमनाथ जाधव यांना तपासाबाबत सुचना देवुन तत्काळ घटनास्थळी रवाना केले . सदर गुन्ह्याचे तपासात , परिस्थतीजन्य पुराव्यावरून मयताचा मुलगा नामे गणेश मारोती पुंड , वय ३० वर्ष , रा . केकतउमरा यास ताब्यात घेवुन सचोटी व कौशल्यपुर्णरित्या विचारपुस केली असता त्याने सदर गुन्हा केल्याची कबुली दिली . मयत हा आपल्या मुलाला नेहमी खालच्या स्तराची वागणुक देत होता . त्यामुळे दोघा बाप - लेकात नेहमी वाद होत होता . बापाचा राग मनात धरून मुलगा नामे गणेश मारोती पुंड , वय ३० वर्ष , रा . केकतऊमरा याने त्यांचा बापाचा खुन केल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून सदर आरोपीस अटक करण्यात आली असुन , तपासाच्या दृष्टीकोनातुन अधिक पुरावा गोळा करणे सुरू आहे . सदरची कार्यवाही जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह , अपर पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस अधीक्षक तथा ग्रामीण पो.स्टे. ठाणेदार महक स्वामी ( भा.पो.से. ) , उपविभागीय पोलीस अधिकारी सुनिल पुजारी , तपास अधिकारी सपोनि संजय मच्छले पो.स्टे . वाशिम ग्रामीण यांनी व त्यांचे अधिनस्त पोलीस अंमलदार यांनी केली .